# पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ

# जिल्हा पोलीस राजपत्र

## दि - 31.10.2018

# भाग 1 - बदली /नेमणुक /पदोन्नती

निरंक

# भाग 2 - रजा

**क्रमांक- सआली-५ /सिक रजा /मपोशि/२४७८ /२०१८** 14142 **यवतमाळ दिनांक** 31 OCT 2018

**आदेश**

**मपोशि/२४७८ प्रियंका मोहदे नेमणुक-पो.स्टे.वणी** आज दिनांक ३१/१०/२०१८ रोजी आमचे आज्ञांकित कक्षेमध्ये हजर झाले असुन त्यांना कर्तव्यावर हजर करुन घेण्यात यावे . त्यांचा ६५ दिवस आजारी रजा कालावधी खालील प्रमाणे मंजूर करण्यात येत आहे

दि.२८/८/२०१८ ते ३१/१०/२०१८ पर्यंतचा-६५ दिवस कालावधी

४० दिवस परावर्तीत रजा

२५ दिवस अर्जित रजा

**(अमरसिंह जाधव)**

**अपर पोलीस अधीक्षक यवतमाळ**

क्रमांक- सआली-५ /सिक रजा /मपोशि-२६२१/२०१८ 100 यवतमाळ दिनांक 30 OCT 2018

## आदेश

**मपोशि/२६२१ शितल चौधरी नेमणुक - पो.मुख्या** हे आज रोजी आमचे आज्ञांकित कक्षेमध्ये हजर झाले असुन त्यांना कर्तव्यावर हजर करुन घेण्यात यावे त्यांचा २२ सिक कालावधी खालील प्रमाणे मंजुर करण्यात येत आहे

**दि. ९/१०/२०१८ ते ३०/१०/२०१८ - २२ दिवस परावर्तीत रजा**

**(अनिलसिंह गौतम)**
**पोलीस उपअधीक्षक(मुख्या)**

---

क्रमांक- सआली-५ /सिक रजा /मपोशि/२४०५/२०१८ 14105 यवतमाळ दिनांक 30 OCT 2018

## आदेश

**मपोशि/२४०५ निलम कोडापे नेमणुक - पो.स्टे वणी** या आज रोजी आमचे आज्ञांकित कक्षेमध्ये हजर झाले असुन त्यांना कर्तव्यावर हजर करुन घेण्यात यावे त्यांचा ६८ दिवसआजारी रजा कालावधी खालील प्रमाणे मंजूर करण्यात येत आहे

**दि.२२/८/२०१८ ते ३०/१०/२०१८ - ६८ दिवस**

**४० दिवस परावर्तीत**

**२८ दिवस अर्जित रजा**

**(अमरसिंह जाधव)**
**अपर पोलीस अधीक्षक यवतमाळ**

# भाग 3 - वेतन/भत्ते / रोखिकरण

14143

क्र.पोअय/ग्रलि/८०-सी/सु.वे.नि.पोहवा-ग्रेड पे/पोहवा-७३०-देशपांडे/ /२०१८ यवतमाळ, दि. 31 OCT 2018

**आदेश**

शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक वेपूर-२०१७/प्र.क्र.१२/सुधारणा-८७/सेवा-९, दिनांक १९/०५/२०१७ अन्वये पोलीस विभागातील पोलीस हवालदार यांचे ग्रेड वेतनात सुधारणा करण्यात आली आहे. पूर्वीचे ग्रेड वेतन रु.२४००/-मध्ये सुधारणा करुन सुधारित ग्रेड वेतन रु.२५००/- करण्यात आले असल्याने पोहवा/७३०, अनिल कृष्णराव देशपांडे (सध्या पोलीस उप निरीक्षक) यांचे वेतनात या कार्यालयाचे दि.२४/११/२०१७ चे आदेशान्वये सुधारित वेतननिश्चिती करण्यात आली होती. तथापी सदर आदेशात दि.०१/०७/२०१२ पासून मंजूर करण्यात आलेल्या वेतनवाढीच्या रकमेत तफावत असल्याचे आढळून आल्याने त्यांना खालीलप्रमाणे सुधारित वेतनवाढी मंजूर करण्यात येत आहेत.

तसेच त्यानंतर त्यांची दि.२९/११/२०१३ पासून पोलीस उप निरीक्षक पदात पदोन्नती झाल्याने त्यांना पोलीस उप निरीक्षक पदात सुधारित वेतनवाढी मंजूर करण्यात येत आहेत.

**वेतन संरचना**

पोलीस पोलीस नाईक :- ५२००-२०२०० ग्रेड पे २४००/-

पोलीस हवालदार (विद्यमान वेतन संरचना):-५२००-२०२०० ग्रेड पे २४००/-

पोलीस हवालदार (सुधारित वेतन संरचना):-५२००-२०२०० ग्रेड पे २५००/-

| मूळ आदेश | | | सुधारित आदेश | | |
|---|---|---|---|---|---|
| वे.वाढ दिनांक | वेतन | ग्रेड पे | वे.वाढ दिनांक | वेतन | ग्रेड पे |
| ०१/०७/२०११ | १२०५०/- | २५००/- | ०१/०७/२०११ | १२०५०/- | २५००/- |
| ०१/०७/२०१२ | १२३९०/- | २५००/- | ०१/०७/२०१२ | १२०५०+४४०=१२४९०/- | २५००/- |
| ०१/०७/२०१३ | १२८४०/- | २५००/- | ०१/०७/२०१३ | १२४९०+४५०=१२९४०/- | २५००/- |
| दि.२९/११/२०१३ रोजी वेतनसंरचना ९३००-३४८०० ग्रेड पे ४३००/-मध्ये अर्हताप्राप्त पोउपनि पदी तात्पुरती पदोन्नती | | | | | |
| २९/११/२०१३ | १२९२०/- | ४३००/- | २९/११/२०१३ | १२९४०+४७०=१३४१०/- | ४३००/- |
| ०१/०७/२०१४ | १३३८०/- | ४३००/- | ०१/०७/२०१४ | १३४१०+५४०=१३९५०/- | ४३००/- |
| ०१/०७/२०१५ | १३९१०/- | ४३००/- | ०१/०७/२०१५ | १३९५०+५५०=१४५००/- | ४३००/- |
| ०१/०७/२०१६ | १४४६०/- | ४३००/- | ०१/०७/२०१६ | १४५००+५७०=१५०७०/- | ४३००/- |
| ०१/०७/२०१७ | १५०३०/- | ४३००/- | ०१/०७/२०१७ | १५०७०+५९०=१५६६०/- | ४३००/- |

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/३०/२३/वेतनश्रेणी-प्र.अ./१०७२०१२, दि.१२/१०/२०१७ अन्वये सदर कर्मचारी यांना पदोन्नतीचे वेतननिश्चितीचा लाभ दि.०१/०१/२००६ ते ३१/०३/२००९ या कालावधीतील अनुज्ञेय थकबाकी एकरकमी संबंधितांच्या भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा करण्यात यावी. तसेच दि.०१/०४/२००९ पासून वेतनाचे प्रत्यक्ष लाभ देण्यात यावे.

**टिप :- दि.१८/०६/१८ रोजी महामार्ग सुरक्षा पथक येथे बदलीवर कार्यमुक्त केले.**

( एम. राज कुमार )
पोलीस अधीक्षक,यवतमाळ.

# भाग 4 - बक्षिस / मानधन

## निरंक

# भाग 5-शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती

क्रमांकःडीपी/३१-बी/पोशि२४०९ गेडाम/निलंबन/ 14104 /२०१८ यवतमाळ दिनांक 30 OCT 2018

**निलंबन आदेश**

आपण पोशि/२४०९ शशिकुमार गेडाम, पो.स्टे.वडकी येथे सलग्न असुन दि.०९/१०/२०१८ रोजी आरोपी रीमांड करीता कर्तव्यास नेमणुक केली असता वि.न्यायालयाचे अंतीम आदेश होण्यापुर्वी आरोपी ईसमास स्वतःचे मर्जिने मुक्त करुन सोडुन दिले. वि.न्यायालयाचे अंतीम आदेश होण्यापुर्वि स्वमर्जीने आरोपीस मुक्त करुन नेमलेल्या कर्तव्यात बेजबाबदार व हलगर्जीपणाचे वर्तन करुन आरोपीस अप्रत्यक्षरीत्या सहकार्य केले. तसेच पो.स्टे.येथे नविन निवासस्थानात वास्तव्यात असता दारु पिवुन राहण, निवासस्थानी अर्धवट वस्त्र परीधान करुन वावर करणे त्यामुळे आजुबाजुच्या निवासस्थानी वास्तव्यात असलेल्या महिलांना लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन करणे, कर्तव्यात गैरहजर राहणे, नेमुनदिलेले कर्तव्य सुरळीतपणे पार न पाडता हलगर्जीपणा करणे असे वर्तन करित असल्याचे दिसुन आले आहे. अशा प्रकारचे कृत्य, गैरवर्तन करुन अत्यंत बेशिस्त वर्तन करीत आहात. ही बाब पोलीस खात्यास अशोभनीय असुन गैरवर्तणुकी बाबत मला प्राप्त अधिकारान्वये चौकशीचे अधिन आदेश दिनांक पासुन तात्काळ प्रभावाने निलंबित करण्यात येत आहे.

२ निलंबन काळात आपले मुख्यालय, पोलीस मुख्यालय यवतमाळ हे निश्चीत करण्यात येत आहे. आपले निलंबन काळात आपण पोलीस उपअधिक्षक मुख्यालय यवतमाळ हयांचे पुर्व परवानगी शिवाय मुख्यालय सोडु नये. या निश्चीत केलेल्या मुख्यालयात आपण दररोज न चुकता हजेरी द्यावी.

३. निलंबन काळात आपणांस निर्वाह भत्ता अस्तीत्वात असलेल्या नियमाप्रमाणे देण्यात येईल. आपण दर महिन्याला निर्वाह भत्ता घेण्यापुर्वी अगोदरच्या महिन्यात (ज्या महिन्याचा त्यांना निर्वाह भत्ता घ्यावयाचा आहे तो महिना) आपण कोणतीही खाजगी नोकरी अथवा कोणताही खाजगी व्यवसाय/ उद्योग केलेला नाही त्याबद्दलचे प्रमाणपत्र द्यावे लागेल.

४. आपणांस असेही सुचीत करण्यात येते की, निलंबन काळातही आपण पोलीस कर्मचारी म्हणुन राहाल निलंबित नसतांना जी जबाबदारी शिस्त व शिक्षा आपणांस लागु होत्या त्याच त्यानां आताही लागु राहतील. फक्त आपले अधिकार कार्य व विशेष सुविधा निलंबन काळात तात्पुरते तहकुब राहतील.

५. पुढे आपणांस असेही सुचीत करण्यात येते की, निलंबन काळात कोणतीही खाजगी नोकरी अथवा व्यवसाय/ उद्योग करण्याची आपणांस परवानगी नाही. जर आपण आपले निलंबन काळात खाजगी नोकरी अथवा खाजगी व्यवसाय/उद्योग केला तर ही गैरवर्तणुक ठरेल व त्याबद्दल आपले विरुध्द योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. अशा प्रकरणात आपला निर्वाह भत्त्यावर अधिकार राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

( एम.राज कुमार )

पोलीस अधीक्षक, यवतमाळ

## भाग 6 - प्रशिक्षण व इतर

निरंक

—— समाप्त ——